# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.09.2025** **वारःशुक्रवार**

1. द्विस्तरीय जीएसटी करपद्धतीचं सर्व स्तरांतून स्वागत; ही करसुधारणा स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी सुधारणा असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आज राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करणार
3. देशभरात ईद-ए-मिलाद आणि ओणमचा उत्साह.
4. अफगाणिस्तानमध्ये पुन्हा भूकंप; मृतांची संख्या 2 हजारपेक्षा जास्त आणि
5. देशाच्या बहुतांश भागात सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाची शक्यता.

**जीएसटी**

केंद्र सरकारने नवीन द्विस्तरीय जी एस टी करपद्धती लागू करण्याच्या जाहीर केलेल्या निर्णयाचं देशभरात सर्व स्तरातून स्वागत होत आहे. नवीन जीएसटी रचनेमुळे चारशे वस्तू स्वस्त होणार असून यामुळे मध्यमवर्गीय नागरिक आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असल्याचं मत व्यक्त करण्यात येत आहे. वस्तू आणि सेवा कररचनेच्या सुसूत्रीकरणाला वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या 56व्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. यापुढे फक्त 5 आणि 18 टक्के अशी दोन स्तरात कर आकारणी होणार असून ही सुधारणा 22 सप्टेंबरपासून लागू केली जाईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बुधवारी जाहीर केलं.

कर प्रणालीतील ही सुधारणा स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी सुधारणा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. शिक्षक दिनाच्या पूर्वसंध्येला पंतप्रधानांनी काल नवी दिल्लीत राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षकांशी संवाद साधला, यावेळी जीएसटी सुधारणांबाबत बोलताना मोदी म्हणाले......

**GST और भी ज्यादा सिंपल हो गया है, सरल हो गया है। GST के मुख्यतः दो ही रेट रह गए हैं, 5 परसेंट और 18 परसेंट, और 22 सितंबर, सोमवार, जब नवरात्रि का पहला दिन है और यह सारी चीजों का मातृशक्ति का संबंध तो बहुत ही रहता है और इसलिए नवरात्रि के इस प्रथम दिवस पर जीएसटी का जो एक रिफॉर्म वर्जन है, नेक्स्ट जनरेशन रिफॉर्म किया हुआ, वो लागू हो जाएगा।**

वस्तु आणि सेवा कर परिषदेने जाहीर केलेल्या सुधारणांमुळे अन्न, औषधे, आवश्यक वस्तू, शेतमाल, हरित ऊर्जा, लहान कार आणि सायकली यासह अनेक वस्तूंवरील कर कमी करण्याबरोबरच जीवन आणि वैद्यकीय विमा, जीवनरक्षक औषधे आणि दुग्धजन्य पदार्थ आणि ब्रेडसह इतर अन्नपदार्थ वस्तू करमुक्त करण्यात आल्या आहेत.

माहिती आणि प्रसारणमंत्री आश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाचं कौतुक केलं आहे. मध्यमवर्गीय आणि कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांवरील आर्थिक बोजा कमी करणारा हा ऐतिहासिक निर्णय आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. दैनंदिन गरजा, औषधनिर्माण, खाद्यपदार्थ, वस्त्र आणि पादत्राणं यावरच्या करात कपात केल्यामुळे ग्राहकांना खूप मोठा फायदा होणार आहे, असं व्यापार आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी म्हटलं आहे. तर आरोग्य क्षेत्रात विविध रोगांवरील उपचाराचा खर्च कमी होणार असून नागरिकांचं जीवनमान सुधारायला मोठी मदत होईल, असं मत केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा यांनी व्यक्त केलं आहे. हा निर्णय अत्यंत ऐतिहासिक आणि क्रांतिकारी असून अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळणार आहे, अशा शब्दांत अखिल भारतीय व्यापारी संघटनेचे सचिव प्रवीण खंडेलवाल यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी या दर कपातीचं स्वागत केलं आहे. हा बदल सरकारने या पूर्वीच करायला हवा होता असं त्यांनी काल मदुराई इथं माध्यमांशी संवाद साधताना सांगितलं.

**<u>मोदी शिक्षक</u>**

देशभरात आज शिक्षक दिन साजरा केला जात आहे. शिक्षणतज्ज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे 66 शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करणार आहेत.

'भारत गुरु-शिष्य परंपरेचा वाहक राहिला असून आजच्या काळातही ही परंपरा महत्त्वाची ठरणार आहे. सशक्त देशाचा पाया रचण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना रुजविण्याचं काम शिक्षकच करू शकतात', असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. काल, शिक्षक दिनाच्या पूर्वसंध्येला पंतप्रधानांनी राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षकांशी नवी दिल्ली इथं संवाद साधला, यावेळी बोलताना ते म्हणाले.....

**आप नई पीढ़ी को सिर्फ अक्षर ज्ञान ही नहीं, बल्कि राष्ट्र के लिए जीने की सीख भी दे रहे हैं। साथियों, शिक्षक एक मजबूत देश, एक सशक्त समाज की बुनियाद होते हैं। शिक्षक, पाठ्यक्रम में, सिलेबस समय के अनुकूल बदलाव इन सारी बातों को समझते भी हैं, काल बाह्य चीजों से वो मुक्ति चाहते हैं और यही भावना, देश के लिए होने वाले रिफॉर्म्स में भी होती है।**

काळानुसार बदलल्याशिवाय, आपल्यामध्ये परिवर्तन घडविल्याशिवाय भारत आजच्या जगातील स्थितीमध्ये स्वतःचं स्थान निर्माण करू शकणार नाही. या कार्यात शिक्षकांचं योगदान अत्यंत महत्त्वाचं ठरणार आहे, असंही मोदी म्हणाले.

**<u>ईद-ए-मिलाद</u>**

देशभरात आज ईद-ए-मिलाद साजरी केली जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. मुहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. प्रेषित मुहम्मद यांची शिकवण आत्मसात करण्यासाठी तसंच समाजात शांती आणि सौहार्द वाढविण्यासाठी प्रेरित करत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्याचबरोबर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासीयांना ओणमच्या शुभेच्छा दिल्या आहेत. ओणम हा सण केरळच्या

समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि परंपरेचं एक उत्कृष्ट उदाहरण असल्याचं सांगताना हा सण देशाच्या शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि सहकार्य आणि सामंजस्याचा सण आहे असं त्यांनी म्हटलं आहे.

**<u>विसर्जन</u>**

महाराष्ट्रात गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची उद्या अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जनानं सांगता होणार आहे. गणेश विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई पुण्यासह ठिकठिकाणच्या स्थानिक प्रशासनानं सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणपूरक व्यवस्थेची काटेकोर आखणी केली आहे.

**<u>सरस</u>**

27वा सरस आजीविका मेळा आज नवी दिल्ली येथे सुरू होत आहे. ग्रामीण महिलांना त्यांच्या उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री करण्याच्या उद्देशाने तसंच देशातील बचत गटांशी संबंधित 400 हून अधिक ग्रामीण महिला या मेळ्यात सहभागी होणार आहेत. 'लखपती दीदी तयार करणं आणि ग्रामीण महिलांना यशस्वी उद्योजक आणि व्होकल फॉर लोकल संकल्पनेच्या दूत बनण्यासाठी सक्षम करणे' असा यंदाच्या सरस मेळयाचा विषय आहे. या मेळयात हस्तकला, हातमाग आणि खाद्य उत्पादने प्रदर्शित केली जाणार असून येत्या 22 सप्टेंबरपर्यंत तो सुरू राहणार आहे.

**<u>मुंबई विद्यापीठ</u>**

एनआयआरएफ अर्थात राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारीत मुंबई विद्यापीठाने देशभरातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या क्रमवारीत 54 व्या स्थानावर झेप घेतली आहे. देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांची 2025 वर्षाची यादी काल जाहीर करण्यात आली त्यामध्ये विद्यापीठाने देशातील विद्यापीठांच्या क्रमवारीत 52 पूर्णांक 48 गुण मिळवत उत्तम कामगिरी केली आहे. तर सर्वसाधारण वर्गवारीत 49 पूर्णांक 80 गुण मिळवत देशातील सर्वोत्तम 100 विद्यापीठांच्या यादीत मुंबई विद्यापीठाने स्थान पटकाविले आहे. तर देशातील पारंपरिक राज्य विद्यापीठांच्या यादीतही उत्तम सुधारणा करत 12 व्या स्थानावर झेप घेतली आहे.

**<u>रशिया-युक्रेन</u>**

रशिया-युक्रेन संघर्ष संपल्यानंतर, युक्रेनमध्ये सुरक्षितता टिकवून ठेवण्यासाठी सैन्य तैनात करण्याच्या वचनाबद्धतेला पश्चिमेकडील 26 देशांनी दुजोरा दिला आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी 35 राष्ट्रांच्या शिखर संमेलनानंतर काल ही घोषणा केली. तत्पूर्वी मॅक्रॉन आणि इतर युरोपियन नेत्यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वलोदीमीर झेलेंस्की आणि अमेरिकेच्या विशेष शांतता दूत स्टीव विटकोव्ह यांच्याबरोबर दीर्घकालीन सैन्य तैनात करण्यासाठी आणि अमेरिकेचा पाठिंबा कायम राखण्यासंदर्भात चर्चा केली.

**<u>भूकंप</u>**

अफगाणिस्तानात काल आग्नेय भागात 6 पूर्णांक 2 रीख्टर तीव्रतेचा भूकंप झाला आहे. त्यामुळे एकंदर मृतांचा आकडा 2200 हून अधिक झाला आहे. रविवारी झालेल्या भूकंपापेक्षाही हा मोठा भूकंप असल्याचं तालिबानच्या प्रवक्त्याने म्हटलं आहे. पाकिस्तान सीमेजवळील दुर्गम शिवा जिल्ह्यात भूकंपाचे केंद्र होते. दरम्यान बचाव कार्यासह

ढिगाऱ्याखालून मृतदेह बाहेर काढण्याचं काम सुरू असून भूकंपग्रस्त भागात अन्न, निवारा आणि वैद्यकीय मदतीची कमतरता असल्याने मदत संस्थांनी मानवीय संकट निर्माण होण्याचा इशारा दिला आहे.

**बुद्धिबळ**

भारतीय खेळाडूंनी उझ्बेकिस्तानमधील समरकंद इथं झालेल्या फिडे ग्रँड स्विस स्पर्धांमध्ये दमदार सुरुवात केली. जगज्जेता डी. गुकेशनं पहिल्या फेरीत फ्रान्सच्या एटिएन बॅक्रोटवर विजय मिळवला. अन्य स्पर्धांमध्ये विदीत गुजराथीनं जर्मनीच्या अलेक्सांडर डोंचेंकोवर विजय मिळवला तर आर. वैशालीनं उझ्बेकिस्तानच्या गुलरुखबेगिम तोखिरजोनोवाला हिला पराभूत केलं. वांतिकानं युक्रेनच्या यूलिया ओस्माकविरुद्ध विजय मिळवला तर डि. हरिका इस्राएलच्या मार्सेल एफोरिम्स्कीसोबत बरोबरीत राहिली.

**हॉकी**

हॉकीमध्ये, भारतानं आशिया करंडक स्पर्धेच्या सुपर फोर टप्प्यात मलेशियावर 4-1 असा विजय नोंदवला आहे. मनप्रीत सिंह, सुखजीत सिंह, शिलानंद लक्ष्मण आणि विवेक सागर प्रसादने प्रत्येकी एक गोल केला. या विजयासह भारत आता सुपर फोर गटात चार गुणांसह आघाडीवर आहे.

**हवामान**

पुढील दोन ते तीन दिवस महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान, सौराष्ट्र, कच्छ, कोकण आणि गोव्यात मुसळधार ते अतिवृष्टीचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. उत्तर भारताच्या बहुतांश राज्यात आणि तेलंगणात काही ठिकाणी विजांसह वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान दिल्लीमध्ये यमुना नदी धोक्याच्या पातळीवर पोहोचली असून अनेक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे.

# याबरोबरच ही राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.